आनंदाचे झाड

राजेन्द्र खेर

'शील' सांभाळण्यातूनच चारित्र्य घडते !

लहानपणापासूनच मुलांचं 'शील' सांभाळलं गेलं की चारित्र्य घडत जातं आणि मग भावी जीवन सुंदर होतं. 'शीलवान भव' या आशीर्वादामागे मोठा गर्भितार्थ आहे.

मी लहान असताना ज्येष्ठ मंडळींना नमस्कार केल्यावर ते आशीर्वाद देत, 'शीलवान भव!' कालपरत्वे आशीर्वाद देण्याचे शब्द बदलत गेले. मग 'कल्याण असो', 'देव तुझं भलं करो' असा बदल होत जाऊन आता 'गॉड ब्लेस यू' इथपर्यंत आपण मजल मारली! कुणी कोणता आशीर्वाद दिला आहे याला खरंतर महत्त्व नसतं. आशीर्वादामागचा भाव महत्त्वाचा असतो. तरीपण आशीर्वाद देण्यामागे काही उत्तम, उदात्त भाव सामावला असेल आणि तो हेतुपुरस्सर दिला असेल, तर मात्र त्यावर विचार केला पाहिजे. पूर्वी देण्यात येणाऱ्या 'शीलवान भव' या आशीर्वादामागे खूप मोठी वैचारिक आणि सांस्कृतिक विचारधारा दडलेली होती. माझ्या आजोबांनी एका वहीत 'शीला' संदर्भात एक प्राचीन गोष्ट लिहून ठेवली होती. पुढच्या काळात ती मला पुराणांमधेही वाचायला मिळाली. ती गोष्ट होती इंद्र- प्रल्हादाची. वाचनीयता राखण्यासाठी तत्त्वज्ञान, इतिहास आणि सदुपदेश हे पौराणिक गोष्टींमधून गुंफलेले असत. अशा गोष्टींमधून ऋषी-मुनी 'लक्षणा'ची आणि 'रूपका'चीही उत्तमपणे गुंफण करीत. याच हेतूनं 'शीला'चं महत्त्व सांगण्यासाठी पुराणकर्त्यांनी इंद्र-प्रल्हादाची ही रूपकात्मक गोष्ट सांगितली आहे. हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद यानं इंद्राचं राज्य जिंकून घेतलं. गेलेलं राज्य परत कसं मिळवावं या विवंचनेत इंद्र असतानाच देवगुरू बृहस्पतींनी त्याला मार्ग दाखवला, ''देवेंद्रा, युद्धभूमीवर प्रल्हादाला जिंकण मुळीच शक्य नाही. कारण प्रल्हाद शीलवान आहे. ज्याच्याकडे 'शील' असतं त्याच्याकडे धर्म, सत्य, वृत्त, बल आणि लक्ष्मी असते. अशा मनुष्याला जिंकणं सोपं खासच नसतं.''

'मग मी काय करावं?' इंद्रानं विचारलं.

''तू प्रल्हादाचं 'शील' मागून घे. म्हणजे तुझे मनोरथ पूर्ण होतील.''

त्यानुसार इंद्र ब्राह्मणवेशात प्रल्हादाकडे गेला आणि त्याची सेवा करू लागला. प्रल्हाद प्रसन्न झाला आणि त्यानं त्या ब्राह्मणाला 'वर' मागायला सांगितलं. इंद्र म्हणाला, 'मला बाकी काहीही नको; फक्त तुझं शील दे.' शील कसं हिरावून घेतलं जातं याची अनेक उदाहरणं 'कौटिलीय अर्थशास्त्रा'तही सांगितलेली आहेत. चारित्र्यहनन कोणकोणत्या मार्गांनी केलं जातं हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही !

प्रल्हाद इंद्राला म्हणाला, 'याचकाला मी कधी विन्मुख पाठवत नाही. माझं 'शील' मी तुला आता देत आहे!' त्याच वेळी प्रल्हादाच्या शरीरातून एक तेज बाहेर पडलं. तेव्हा प्रल्हादानं त्या तेजाला विचारलं, 'तू कोण आहेस ?'

'मी शील आहे...'

तेवढ्यात दुसरं एक तेज प्रल्हादाच्या शरीरातून बाहेर पडलं. 'तू कोण आहेस ?' प्रल्हादानं विचारलं.

ते तेज म्हणालं, 'मी 'धर्म' आहे. जिथे 'शील' असतं तिथेच 'धर्म' असतो. ''

तिसरं तेज बाहेर पडताच प्रल्हादानं तसाच प्रश्न केला. तेव्हा त्या तेजानं म्हटलं, ''मी 'सत्य' आहे. जिकडे 'धर्म' असतो तिकडे सत्य असतं.''

त्यानंतर चौथं तेज बाहेर पडलं. ते प्रल्हादाला म्हणालं, ''मी 'वृत्त' आहे! जिकडे 'सत्य' असतं तिकडे 'वृत्त' असतं!'' वृत्त म्हणजे सद्वर्तन.

पाचवं तेज जेव्हा प्रल्हादाच्या शरीरातून बाहेर पडलं तेव्हा त्यानं विचारलं, 'तू कोण आहेस ?'

ते तेज म्हणालं, ''मी 'बल' आहे; जिथे 'वृत्त' असतं तिथे 'बल' असतं!'' अर्थात जिथे सद्वर्तन असतं तिथे नेहमी बल असतं. कृतज्ञताबुद्धीत जसं धैर्य सामावलेलं असतं तसंच सद्वर्तनात बल सामावलेलं असतं.

त्यानंतर एक स्त्री प्रल्हादाच्या शरीरातून बाहेर पडली. प्रल्हादानं विचारणा करताच ती म्हणाली, ''मी लक्ष्मी आहे; म्हणजे 'श्री' आहे. जिकडे 'बल' असतं तिकडे मी असते.'' धर्म, सत्य, वृत्त, बल आणि लक्ष्मी या प्रत्येक तत्त्वामधे खूप मोठा अर्थ दडला आहे. त्याचा स्वतंत्र विचार करावा लागेल. अशातऱ्हेनं 'शील' गेल्यामुळे प्रल्हाद पूर्णतः शक्तिहीन झाला. मग इंद्रानं प्रल्हादाच्या राज्यावर आक्रमण करून गेलेलं राज्य पुन्हा जिंकून घेतलं. एक 'शील' गमावल्यामुळे आपण राज्य गमावून बसलो, हे प्रल्हादाच्या तेव्हा ध्यानात आलं. थोडक्यात, धर्म, सत्य, वृत्त, बल आणि लक्ष्मी यांचं मूळ ठिकाण 'शील' असतं. त्यातूनच व्यक्तीचं चारित्र्य घडत असतं. इंग्रजीतील एक म्हण प्रसिद्ध आहे, 'If money is lost nothing is lost, if health is lost something is lost; but if character is lost everything is lost. तात्पर्य, भारतीय संस्कृतीत 'शीलवान भव' असा आशीर्वाद देण्यामागे फार मोठी विचारधारा होती. म्हणूनच 'शील' राखण्याला अनन्यसाधारण महत्त्व दिलं गेलं होतं. आपल्या मुलांमधे 'शील' निर्माण व्हावं असं वाटत असेल तर त्याची सुरुवात सुसंस्कारांनीच होते. सुसंस्कारांमुळेच पाल्य चारित्र्यवान बनतात. झाड लहान असताना त्याच्या सालीवर कोरलेली अक्षरं झाड मोठं झाल्यावर मोठी दिसू लागतात. त्याचप्रमाणे मुलांच्या मनावर लहानपणी झालेले सुसंस्कार आयुष्यभर त्याची सोबत करतात.

संस्काराचे महत्त्व

एका महिलेनं गुरूंना विचारलं, ''माझा मुलगा चार वर्षांचा आहे. त्याला शिक्षण द्यायला केव्हा सुरुवात करू?'' गुरू म्हणाले, 'ताई, तुम्ही त्याची चार वर्षं फुकट घालवलीत! मुलाच्या मुखावर जेव्हा पहिलं हास्य उमटतं तेव्हाच त्याच्या शिक्षणाला प्रारंभ होतो!' म्हणजे संस्कार करणं तेव्हापासून आवश्यक असतं. त्यासाठीच आईचं महत्त्व आहे. आई मुलांचं चारित्र्य घडवत असते. इमर्सन हा अमेरिकन विचारवंत म्हणतो, 'मुलांची खरी उन्नती मातांच्या नैतिक बळामुळे झालेली असते.' बाल शिवाजीराजांना रामायण-महाभारतातील अनेक वीरकथा आणि इतर प्रेरक कथा सांगून जिजाऊ मांसाहेबांनी असंच घडवलं होतं. ऋतुध्वज या राजाची पतिव्रता राणी मदालसा हिनं आपल्या विक्रान्त, सुबाहू, शत्रुमर्दन आणि अलर्क या पुत्रांना त्यांच्या जन्मापासून बोध करून ज्ञानसंपन्न आणि चारित्र्यसंपन्न बनवलं होतं, असा उल्लेख मार्कंडेय पुराणात आहे. आर्याम्बा मातेनं शंकराचार्यांना असंच घडवलं होतं. आई मुलांना कशी घडवते याची असंख्य उदाहरणं सांगता येतील. जॉर्ज हर्बर्ट यांनी म्हटलं आहे, 'एक आई ही शंभर शिक्षकांच्या बरोबरीची असते!' म्हणूनच, घर ही चारित्र्यसंवर्धनाची प्राथमिक शाळा आहे, असं म्हटलं जातं. संस्कारांच्या पायावरच मुलांचं भावी आयुष्य चांगलं अथवा वाईट ठरत असतं. कविवर्य जॉन मिल्टन यांनी म्हटलं आहे, 'सकाळ झाली म्हणजे ज्याप्रमाणे ती दिवसाचं दर्शन घडवते, त्याप्रमाणे मुलाच्या बालपणीच त्याच्या मोठेपणाचं प्रतिबिंब उमटत असतं.' आईनंतर शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देतो. चाणक्यानंही शिक्षकाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे. चारित्र्याला किती महत्त्व आहे, हे अशा गोष्टींवरून समजून येतं. लहानपणापासूनच मुलांचं 'शील' सांभाळलं गेलं की चारित्र्य घडत जातं आणि मग भावी जीवन सुंदर होतं. 'शीलवान भव' या आशीर्वादामागे केवढा मोठा गर्भितार्थ दडला आहे हे अशा उदाहरणांवरून समजून येतं.

(लेखक साहित्यिक / कादंबरीकार आहेत.)

rkher1961@gmail.com

राजधानी मुंबई

गोष्ट बिघडलेल्या वातावरणाची

गुंतवणूक खेचून आणायची असेल तर प्रथम महाराष्ट्र तणावमुक्त करावा लागेल. प्रत्येक जिल्ह्यात शांतता नांदेल, याची काळजी घ्यावी लागेल.

मृणालिनी नानिवडेकर

रखडलेला विस्तार

सामाजिक प्रश्नांमुळे मंत्रिमंडळ विस्तार अडकला आहे, असे म्हणतात. भाजपचे संख्याबळ अधिक असले मंत्री कमी आहेत, मुख्यमंत्री शिंदे गटातही अस्वस्थता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मंत्रिपदाकडे डोळे लावून आहे. एक वर्षातच निवडणुका येणार आहेत. त्यामुळे इच्छुकांना वाटतेय, 'अभी नही तो कभी नही.' काही करुन दाखवायचे असेल तर तसाही उशीर झालाय. खाते समजायला निदान तीन महिने अन् मग अंमलबजावणीला दोन महिने अशी कारकीर्द असेल तरच खरे असते. आता वेळ निघून गेली आहे, असे म्हणतात. संधी मिळालीच तर मर्यादित षटकांच्या काळात कोण काय दिवे लावतो ते पाहायचे.

गेल्या काही वर्षात महाराष्ट्राचे जे काही भयाण वास्तव समोर येते आहे, ते आगामी काळात काही गंभीर समस्या निर्माण करू शकते. राजकीय अस्थिरता वाढते आहे. मोदीपर्वाचा २०१४मध्ये भारताच्या राजकारणात प्रारंभ झाला, अन् महाराष्ट्राचे राजकीय वास्तव बदलले. तसे ते १९९५ मध्येही बदलले होते. पण शिवसेना-भाजपने त्यावेळी मिळवलेल्या यशात काँग्रेसमधील दुफळीचे मोठे योगदान होते. अपक्ष आमदार हे त्या सत्तेतले खरे नायक होते अन् त्यांना विकासाचे भान होते. पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचनाचा प्रश्न या अपक्षांनीच मार्गी लावला.

२०१४च्या विधानसभा निवडणुकीने महाराष्ट्राचे राजकीय वास्तव बदलवले. काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस यांची राजकारणातली प्रमुख भूमिका जनमताने बदलवली. भाजपला मोदीलाटेचा जबरी लाभ झाला; पण स्वबळावर सत्ता मिळावी, इतक्या जागा मात्र मिळाल्या नाहीत. रुसलेली शिवसेना विरोधी बाकावर बसली; पण ती गरजेची आहे, हे लक्षात घेत झालेल्या मनधरणीने देवेंद्र फडणवीस - उद्धव ठाकरे यांचे मनोमीलन झाले. सत्तेला स्थैर्य आले. निवडणुकीला एकत्र सामोरे जाऊनही नंतर मनभेद झाले. महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली. पुढचा इतिहास सर्वज्ञात आहे. आधी महाविकास आघाडीचे सरकार आणि मग पक्षीय फाटाफुटीनंतर सध्या सत्तेवर असलेले एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले. पाच पक्षांच्या महाराष्ट्रात आठ कोन झाले. वंचित- बहुजन आघाडी दखलपात्र मते खेचत असल्याने नऊ पक्ष महाराष्ट्राच्या भूतलावर बागडत आहेत. आघाड्या हाच धर्म मानला जातो आहे. वैचारिकता भिन्न आहेत अन् त्यामुळे सत्ता येनकेनप्रकारेण आपल्याकडे खेचणे हेच सर्वपक्षीय उद्दिष्ट झाले आहे. राजकारण असेच असते हे मान्य केले तरीही प्रश्न उरतो तो महाराष्ट्राच्या भल्याचा. कोणत्याही शहाण्यासुरत्या माणसाने या भल्याचाच विचार करायला हवा. हे भले महाराष्ट्रातल्या अस्थिरतेत अडकून पडले आहे. आंदोलनांची तीव्रता प्रगतीच्या मार्गातला अडसर ठरता कामा नये, याचे भान बाळगणे आवश्यक झाले आहे. हे भान राज्यकर्त्यांनी तर बाळगायला हवेच; पण राजकीय पक्षांनी आणि अगदी सामाजिक संघटनांनीही यातली आपली जबाबदारी ओळखायला हवी.

राजकारण विकासाच्या मुळावर?

महाराष्ट्रातील राजकीय फोडाफोडी आणि सामाजिक आंदोलने विकासाच्या मुळावर तर येत नाहीयेत ना, याची काळजी घ्यायला हवी. ते भविष्याप्रती असलेले आपले सामाजिक उत्तरदायित्व आहे. मराठा समाजाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. विकासाची फळे राज्यकर्ते खोल पोहोचवू शकले नाहीत म्हणून समाज अस्वस्थ आहे. एखादीही हाक वातावरण पेटवण्यास पुरेशी ठरते. शेतीचे प्रश्न सिंचनसोयींअभावी नापिकीशी जोडले गेले. सिंचनाचा शिडकावा महाराष्ट्रातल्या तृषार्त जमिनीसाठी अप्राप्यच आहे. दुष्काळात तेरावा महिना हवामान बदलाचा. शेती बहुतांश जिल्ह्यात नुकसानीची आहे.

आज महाराष्ट्रात तंत्रविद्या शिकवणाऱ्या विद्यापीठांची संख्या देशात कदाचित सर्वाधिक असेल. येथे तयार होणारे प्रशिक्षित तरुण उद्योग आणि व्यापारउदिमाव्दारे प्रगती करु शकतील. सिंचनसोयी नसलेल्या कुठल्याही प्रदेशाच्या विकासाची मदार ही औद्योगिक प्रगतीवर असू शकते. या प्रशिक्षित बळाच्या आधारावर महाराष्ट्र केवळ देशाचे नव्हे तर जगाची सप्लाय-चेन सांभाळू शकतो. मायक्रोचिप्स, मोबाईल फोनचे सुटे भाग अशा कितीतरी आधुनिक गोष्टी येथे तयार होऊ शकतात.

महाराष्ट्राकडे आजही उद्योजक आशेचा किरण म्हणून पाहातात. गुंतवणुकीचे सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणून या राज्याकडे पाहिले जाई. गुजरातेत गोध्रा दंगल पेटली, तेव्हा त्यावेळी तिथले मुख्यमंत्री असलेल्या नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम आवाहन केले ते उद्योजकांना. ''आमचे विरोधक अपप्रचार करताहेत, आम्ही शांतता प्रस्थापित करु, राज्य सोडून जाऊ नका,'' अशी साद घातली. औद्योगिक प्रतिष्ठानांना हाक घातली. नॅनोसाठी रतन टाटांना 'स्वागत है, आवजो' चा निरोप पाठवला. हे सगळे सर्वविदित आहे. थोडक्यात काही विपरीत घडले, की समाजमनावर फुंकर घालतानाच उद्योग दूर जाणार नाहीत, याची काळजी घ्यायची असते. महाराष्ट्र ती घेते आहे का?

मराठी-अमराठी वाद झाले तेव्हा 'खळ्ळ-खट्याक'ने वैतागलेले अमराठी तर महाराष्ट्र सोडून गेलेच; पण राज्याचा लौकिक खराब झाला. आज तशी वेळ आली आहे. महाराष्ट्र नको म्हणत उद्योजक गुजरात- कर्नाटक- तमिळनाडूला पसंती देऊ लागले आहेत. ही स्पर्धा जिंकायची असेल, तर महाराष्ट्र तणावमुक्त करावा लागेल. प्रत्येक जिल्ह्यात शांतता नांदेल, याची काळजी घ्यावी लागेल. काळाचे आव्हान मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री पेलू शकतात काय ते पाहायचे. आंदोलकांची डोकी फिरवणारी मंडळी बरीच असतीलही; पण विवेकाचा स्वर त्यांना समजावून सांगावा लागेल. कालबद्ध मर्यादेत जे प्रश्न सोडवता येतील ते सोडवायला हवेत. जे सुटू शकत नाहीत, त्याची मोकळेपणाने कल्पना द्यावी लागेल. विश्वास निर्माण करावा लागेल. मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर सर्व पक्षांनी एकत्र येऊन दिलासा देणारा ठराव करण्याची कल्पना देवेंद्र फडणवीस यांनी मांडली म्हणतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ती उचलून धरली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या प्रस्तावाला मनापासून प्रतिसाद दिला. सगळे नेते हजर झाले. व्यक्तिगत मतभेद दूर ठेवून उद्धव ठाकरे यांनाही निमंत्रण देणे उचित ठरले असते. तसे झाले नाही हे दुर्दैव. पण त्याचा बाऊ न करता शिवसेना ठाकरे गटाचे नेते बैठकीला हजर झाले. सर्व राजकीय पक्षांनी शांततेचे आवाहन केले. ती महाराष्ट्राची गरज झाली आहे. तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी सर्वांनी असेच प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज कुणीही प्रश्न न बनता उत्तराचा भाग ठरावे. येणारा दिव्यांचा सण महाराष्ट्राचा कोपरा न् कोपरा उजळवून टाको ही सदिच्छा.

'महादेव'सहित २२ ॲपवर बंदी

सक्तवसुली संचालनालयाच्या विनंतीनुसार कारवाई

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ५ : मागील काही दिवसांपासून चर्चेत आलेल्या महादेव बेटिंग ॲप सहित २२ ॲपवर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) विनंतीनुसार ही बंदी घातली जात असल्याचे इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडून सांगण्यात आले.

ज्या ॲपवर बंदी घालण्यात आली आहे ते सर्व बेकायदा सट्टा चालविणारे ॲप आहेत. हवाला प्रकरणाच्या अनुषंगाने 'महादेव ॲप' ची 'ईडी'कडून चौकशी सुरू असून यासंदर्भात छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी छापेही घालण्यात आले होते.

'ईडी'ने २३ ऑक्टोबर रोजी पहिले दोषारोपपत्र दाखल केले होते. 'महादेव' ॲप चालविणाऱ्यांकडून छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना कोट्यवधी रुपये मिळाल्याचा आरोप झाल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. छत्तीसगड विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपने हा मुद्दा उचलून धरला आहे. गेल्या दीड वर्षांपासून याबाबतचा तपास सुरू असताना संबंधित ॲपवर बंदी घालण्याची कोणतीही शिफारस छत्तीसगड सरकारकडून करण्यात आली नव्हती मात्र आता याप्रकरणी सर्वप्रथम 'ईडी'कडून शिफारस करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने कारवाईचा बडगा उगारला आहे.

युतीबाबत निर्णय नाही : मेहबुबा

मेहबूबा मुफ्ती

श्रीनगर, ता. ५ : अन्य पक्षांसोबत युती करून जम्मू-काश्मीरमधील निवडणुका लढविण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्याचे पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या (पीडीपी) अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती यांनी सांगितले. यावेळी त्यांनी राज्यातील वाढत्या दहशतवादी हल्ल्यांबाबत देखील चिंता व्यक्त केली. मध्यंतरी परप्रांतीय कामगारांना लक्ष्य करून दहशतवाद्यांकडून हल्ले करण्यात आले होते, यामध्ये अनेकांना जीव गमवावा लागला होता.

लग्नाच्या भूलथापा देत महिलेवर अत्याचार

नवी मुंबई, ता. ५ (वार्ताहर) : सिंगापूरमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने लग्न जुळविण्याऱ्या संकेतस्थळावरून नवी मुंबईत राहणाऱ्या एका ३३ वर्षीय महिलेला लग्नाच्या लग्नाच्या भूलथापा देत अनेक वेळा अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणात नवी मुंबई पोलिसांनी सिंगापूर येथे राहणाऱ्या व्यक्तीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. या घटनेतील पीडित महिला नवी मुंबईत राहण्यास असून मार्च २०२०मध्ये तिची लग्न जुळविण्याऱ्या संकेतस्थळावरून सिंगापूर येथे राहणाऱ्या व्यक्तीसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपी व्यक्तीने पीडित महिलेसोबत जवळीक वाढवून तिला लग्नाच्या भूलथापा दिल्या. त्यानंतर आरोपी व्यक्तीने पीडित महिलेला नवी मुंबई, मुंबई आणि सिंगापूर येथील हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केले. या दरम्यान आरोपीने महिलेचे फोटो आणि व्हिडिओ देखील काढल्याचा संशय पीडित महिलेने तक्रारीत व्यक्त केला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'अवतरणार्थ' पुस्तकाचे आज प्रकाशन

पान १ वरून

परखड विचारांची खऱ्या अर्थाने शिदोरी म्हणता येईल. ज्या विषयांवर सहसा कुणी व्यक्त होत नाही, त्यांना 'अवतरणार्थ'मध्ये जागा मिळाली. विषय, विचार आणि व्यक्तीच्या मुळात जाऊन सत्यशोधनाचा गडपाले यांनी केलेला प्रयत्न प्रशंसनीय ठरला. संपूर्ण पुस्तकात महात्मा गांधींपासून अण्णा हजारेंपर्यंत करण्यात आलेली मांडणी आणि व्यक्तित्वाचा शोध अत्यंत परखड असून, विचार करावयास भाग पाडणारा आहे. आजमितीस बोकाळलेल्या समाजमाध्यम नावाच्या निम्न विद्यापीठाला लेखकाने बऱ्यापैकी आरसा दाखविला आहे. 'सकाळ प्रकाशन'च्या वतीने 'अवतरणार्थ' या सदरातील लेख पुस्तकरूपात येत आहे. त्याचा सोहळा सोमवारी (ता. ६) विविध मान्यवरांच्या साक्षीने रंगणार आहे.

'क्युरेटिव्ह पिटिशन' ही मलमपट्टी

पान १ वरून

भक्कम करतोय. दगा फटक्याची भीती आहे त्यामुळे पुढील आंदोलनाचीही तयारी सुरू आहे. राज्यातील गावागावांत एक डिसेंबरपासून साखळी उपोषण सुरू केले जाणार आहे. काही गावांत सध्याही असे उपोषण सुरू आहे. त्यात अन्य गावांची भर पडेल.' 'राज्यातील मराठा समाजाचे वाटोळे झाले आहे. आता पुन्हा लेकरांचे वाटोळे होऊ द्यायचे नाही. त्यामुळे सरकारने २४ डिसेंबरपर्यंत मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या आत ओबीसीतून कुणबी प्रमाणपत्र द्यावे,' अशी मागणी जरांगे-पाटील यांनी केली.

सदावर्तेंना जे करायचे ते करू द्या!

ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्याविषयी विचारले असता, जरांगे म्हणाले, 'त्यांच्याबाबत काही बोलायचे नाही. त्यांना जे वाटते ते त्यांना करू द्या. आम्हाला कुणाचेही वाईट चिंतायचे नाही. मुंबईमध्ये बैठकीचे आमंत्रण आले आहे. मात्र मी रुग्णालयात असल्याने बैठकीला जाऊ शकणार नाही.' मंत्री छगन भुजबळ संभाजीनगरात येत असून भेटायला आले तर, या प्रश्नावर जरांगेंनी हसत या विषयी बोलायचे टाळले.

प्रदूषणाचा कडेलोट!

पान १ वरून

पंजाबी बाग, आर. के. पूरम, जहांगीर पुरी, नोएडा, गाझियाबाद, गुरुग्राम, या भागांचा समावेश आहे. पंजाब, हरियाना आणि उत्तर प्रदेश या राज्यांत पिके काढल्यानंतरचा कचरा मोठ्या प्रमाणात जाळला जात असल्याने प्रदूषण वाढले असल्याचे दिल्ली सरकारचे म्हणणे आहे.

आयक्यू एअरच्या माहितीनुसार दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) रविवारी सकाळी पावणेबारा वाजता ७०१ नोंदवला गेला. तोच सकाळी साडेसात वाजता ४८३ होता.जागतिक हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित दहा शहरांमध्ये दिल्ली, कोलकता आणि मुंबई या तीन भारतीय शहरांचा समावेश आहे.

दिल्लीतील हवेचा दर्जा गेल्या चार-पाच दिवसांपासून खालावत आहे. त्यामुळे शुक्रवार व शनिवारी शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. आता दिल्ली सरकारने प्राथमिक शाळा १० नोव्हेंबरपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दिल्लीच्या शिक्षण मंत्री अतिशी याबाबत म्हणाल्या, ''इयत्ता ६-१२वीच्या विद्यार्थ्यांसाठीही ऑनलाइन वर्ग घेण्याचा विचार केला जात आहे.''

'जीआरएपी'चा चौथा टप्पा लागू गेल्याने अनेक निर्बंधही वाहतूक, बांधकामे आदींबाबत यांच्यावर लावण्यात आले आहेत. हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४५०पेक्षा जास्त झाला की हा टप्पा लागू करण्यात येतो. प्रदूषणामुळे त्वचा आणि हृदयाशी संबंधित आजार होण्याचा धोका असल्याचे डॉक्टरांचे मत आहे. याशिवाय मधुमेह, अल्झायमर आणि सतत डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो. हवेची गुणवत्ता घसरल्याने श्वसनसंस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता असते. लहान मुलांच्या मेंदूच्या विकासावर परिणाम होऊ शकतो, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक ०-५० या दरम्यान असला तर हवेचा दर्जा चांगला मानला जातो, तर ३०१-५०० दरम्यानचा निर्देशांक आरोग्यासाठी घातक मानला जातो.

जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरे

शहर (देश)	एक्यूआय	हवेचा दर्जा
१) दिल्ली (भारत)	४८३	धोकादायक
२) लाहोर (पाकिस्तान)	३७१	धोकादायक
३) कोलकता (भारत)	२०६	खूप वाईट
४) ढाका (बांगलादेश)	१८९	वाईट
५) मुंबई (भारत)	१६२	वाईट
६) कराची (पाकिस्तान)	१५९	वाईट
७) शेनयांग, (चीन)	१५९	वाईट
८) हांग चौऊ (चीन)	१५९	वाईट
९) कुवेत शहर (कुवेत)	१५५	वाईट
१०) वुहान (चीन)	१५५	वाईट

स्रोत : स्वीस ग्रुप एक्यू एअर, रविवार सकाळी साडेसात वाजताची स्थिती

सर्व विभागांची बैठक

दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी उद्या (सोमवारी) सर्व संबंधित विभागांची बैठक बोलावली आहे. तसेच त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान आणि हरियाना या राज्यांच्या पर्यावरण मंत्र्यांची बैठक बोलविण्याची मागणी केली. दिल्लीच्या शेजारील राज्यांमध्ये 'कमिशन ऑफ एअर क्वालिटी मॅनेजमेंट'च्या नियमांचे उल्लंघन केले जात असल्याचा आरोप राय यांनी केला आहे.

TATA AIG INSURANCE WITH YOU ALWAYS

टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: पेनिन्सुला बिझनेस पार्क, टॉवर ए, १५ वा मजला, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३
दूर.: ०२२-६६६९९७६१ / फॅक्स: ०२२-६६५४६४६४
ई-मेल: secretarialdepartment.tataaig@tataaig.com
वेबसाइट: www.tataaig.com | सीआयएन: U85110MH2000PLC128425

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीद्वारे जारी व दिनांक १९ डिसेंबर, २०२९ रोजी विमोचनयोग्य असलेल्या दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजीनुसार अप्रतिभूत, दुय्यम, सूचिबद्ध, विमोचनयोग्य बिगरपरीवर्तनीय पूर्णतः प्रदानित डिबेंचर्सवर देय ८.८५ टक्के (८.८५%) दराने वार्षिक व्याज प्राप्त करण्यासाठी पात्र असलेल्या कंपनीच्या कर्जरोखे डिबेंचरधारकांच्या पात्रतेच्या निश्चितीसाठी सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०२३ ही तारीख नोंद दिनांक म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

कर्जरोखेधारकांनी कृपया कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट, एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड यांना, लागू असल्यानुसार कर्जरोखेधारकांचे संपूर्ण नाव, पत्ता क्लायन्ट आयडी व डीपी आयडी लागू असल्याप्रमाणे नमूद करुन सर्व भविष्यकालीन पत्रव्यवहार, कर्जरोख्यांवरील व्याजासंदर्भात तसेच पत्त्यातील बदलांची सूचना द्यावी.

टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड
सही/-
आशिष शर्मा
कंपनी सचिव
मेंबरशिप क्रमांक: ACS 18936

ठिकाण: मुंबई
दिनांक: ४ नोव्हेंबर, २०२३

अग्रोवन सकाळ

दिवाळी अंकात काय वाचाल?

समृद्ध करणारा लेखनप्रवास

साहित्य प्रवास आपण दोन माध्यमांतून करतो एक म्हणजे प्रत्यक्ष पुस्तक अथवा साहित्य वाचून. ते वाचताना त्या लेखकाबरोबर, त्याच्या सुखदुःखाबरोबर आपण प्रवास करतो. अनेक मराठी नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, पाक्षिकांसाठी मी विज्ञान व त्यास जोडून असलेल्या संशोधनावर लिखाण केले आहे; परंतु मला माझा सर्वांत जास्त आवडलेला, पूर्ण समाधान देणारा प्रवास म्हणजे 'अॅग्रोवन'मध्ये मी गेली १५ वर्षे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ओघवत्या भाषेत करत असलेले लिखाण. – नागेश टेकाळे

जगभर पोहोचले 'एसआरटी' तंत्र

जलद गतीने 'एसआरटी' तंत्राचा प्रसार होण्यामागे मुख्य सहभाग असेल तर तो प्रसार माध्यमांचा. माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमांमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या, शेतात, प्रवासात विविध तंत्रज्ञानाची माहिती अगदी सहज उपलब्ध होत आहे. नवीन तंत्रज्ञानाने सुसज्ज व्हा, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान रुजवा असा आश्वासक बदल शेतकऱ्यांमध्ये दिसू लागला आहे. – चंद्रशेखर भडसावळे

लिहिणं वरलं अर्थपूर्ण

शेतकऱ्यांमध्ये बदल करण्याच्या हेतूने मी लेखन करत नाही. तरीही या लेखनाचा हळूहळू, पण निश्चितपणे परिणाम होतोय. मुख्य म्हणजे शेतकऱ्यांचा शेतीकडं बघण्याचा दृष्टिकोन बदलतोय. मात्र 'अॅग्रोवन'ने स्वतःच्या या बलस्थानाचा अधिक सकारात्मक पद्धतीने वापर करून घ्यायला हवा असं वाटतं. मी या दैनिकात लिहितो हे अभिमानाने सांगतो. कारण इथं लिहिणं खऱ्या अर्थानं अर्थपूर्ण आहे. – महारुद्र मंगनाळे

याशिवाय
- २५ यशकथा
- चिकित्सा
- केस स्टडी
- कथा
- व्यंग्यचित्रे
- लेखक मांदियाळी
- अनुभव
- ललित लेख
- कविता
- राशिभविष्य

अंक सर्वत्र उपलब्ध संपर्क 9881598815